**हर सूर प्रियेसाठी गायला**

हा समय सखीस भेटण्याचा
मुग्ध सांज साथीला
शब्द होऊन प्रेमभाव
घननीळ जैसा बरसला

लाविला षड्ज हृदयातला हा
आळविला निर्मळ "सा".......सा.......सारेग, रेगम, गमप, मपध, पधनी, धनीसां.......सा सा.......
लाविला जो षड्ज कंठी
सखीसाठी गायला

रेशमी रीषभातला "रे"
तलम करुनी गुंफिला
निर्मिलेला सूर कंठी
प्रियेसाठी गायला

धुंद गंधारातला "ग"
लेऊन आला प्रणयगंध
मिसळला तो गंध कंठी
प्रियेसाठी गायला

अवीट मध्यमातला "म"
आर्त होऊनी छेडीला
त्यासही माळला कंठी
प्रियेसाठी गायला

पंचमीचा सुखद "प"
प्राण ओतून चेतविला
तन्मय होऊन कंठी
प्रियेसाठी गायला

मधुर धैवतातील "ध"
तरल संध्येत जागला
उसळुनी प्रेमरंग कंठी
प्रियेसाठी गायला

आल्हाद नीषादातला "नी"
कातरवेळी बरसला
दाटला प्रेमरस कंठी
प्रियेसाठी गायला

परत मोहुनी छेडीला "सां"
अंतरी रोमांच जागला
आळविला हर सूर कंठी
प्रियेसाठी गायला

**© Sachin P. Kulkarni**
sachin.kulkarni78@gmail.com
www.saarthbodh.com